## अंबरनाथ नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदी श्रीम.मनिषा वाळेकर



अंबरनाथ नगरपरिषदेमध्ये नगराध्यक्ष आणि उपनगराध्यक्ष निवडणूक बिनविरोध झाली असून नगराध्यक्षपदी शिवसेनेच्या मनिषा वाळेकर आणि उपनगराध्यक्षपदी शिवसेनेचे अब्दुल शेख यांची निवड झाली आहे.

कल्याणचे उपविभागीय अधिकारी प्रसाद उकर्डे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी दि.२१/११/२०१७ रोजी निवडणूक झाली. शिवसेनेच्या मनिषा वाळेकर यांनी उमेदवारी अर्ज भरलेल्या दिवशी शनिवारीच (दि.१८/११/२०१७ ) राष्ट्रवादी, कॉंग्रेस आणि मनसे या राजकीय पक्षांनी पाठिंबा दिल्याने त्यांची नगराध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली होती. त्याची औपचारिक घोषणा यावेळी करण्यांत आली.



## अंबरनाथ नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी श्री.अब्दुल शेख

उपनगराध्यक्ष पदासाठी शिवसेनेच्या अब्दुल शेख यांचा एकमेव उमेदवारी अर्ज आल्याने श्री.शेख यांचीही बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यांत आले. पिठासीन अधिकारी श्री.उकर्डे, मुख्याधिकारी देवीदास पवार यांनी उपनगराध्यक्ष अब्दुल शेख यांचे अभिनंदन केले.